लोकमत
रविवार २६.५.२०२४

# कोतोलीच्या विवेक लव्हटेचे बारावीत यश



**करंजफेण :** पन्हाळा तालुक्यातील कोतोली येथील विवेक कृष्णात लव्हटे याने बारावीच्या परीक्षेत कला शाखेतून ९०.८३ टक्के गुण मिळवून विवेकानंद कॉलेजमध्ये प्रथम येण्याचा मान मिळविला.

सातत्याने केलेल्या अभ्यासाचे फलित असून भविष्यात नामांकित वकील होण्याचे उद्दिष्ट असल्याचे विवेक याने सांगितले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्य आर. आर. कुंभार, वडील ॲड. कृष्णात लव्हटे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
रविवार, २६ मे २०२४

# 'विवेकानंद'च्या अनिश जाधव याची अमेरिकेतील विद्यापीठात निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयामधील बारावी सायन्सचा विद्यार्थी अनिश प्रवीण जाधव याची अमेरिकेतील नामवंत दहा विद्यापीठांमध्ये अभियांत्रिकी पदवी शिक्षणासाठी महाराष्ट्रातून निवड झाली आहे. त्याबद्दल त्याचा प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अनिश जाधव हा जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे-जाधव व डॉ. प्रवीण जाधव यांचा मुलगा आहे. अमेरिकेतील मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटी, रोचेस्टर युनिव्हर्सिटी, पेनसिल्व्हेनिया स्टेट युनिव्हर्सिटी, ह्युस्टन युनिव्हर्सिटी, सॅन डीओगो स्टेट युनिव्हर्सिटी, कॅलिफोर्निया स्टेट युनिव्हर्सिटी नॉर्थरीज, सॅन फ्रान्सिस्को स्टेट युनिव्हर्सिटी, अॅरिझोना स्टेट युनिव्हर्सिटी व केंट स्टेट युनिव्हर्सिटी ही दहा विद्यापीठे जागतिक स्तरावर उच्च दर्जाची व संशोधनासाठी विख्यात आहेत. भारतातून अशा विद्यापीठात निवड होऊन यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी असते. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले.